<u>**नियमीत दिवाणी दावा क्र.१९२/२०१३ मधील अर्ज नि.क्र.६१,६३ व ६५ वरील एकत्रीत आदेश**</u>

प्रसतुतचे अर्ज हे वादीतर्फे मयत प्रतिवादी क्र.२ चे कायदेशीर वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी मिळण्याकरिता व त्यासाठी झालेला विलंब माफ होवून मिळण्यासाठी दाखल केलेले आहेत. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.२ हे दि.१४/११/२०१६ रोजी मयत झाले आहेत. प्रतिवादी क्र.२ यांचे सरळ कायदेशीर वारस हे मंगल चंद्रकांत मळवाडे, गिरीष चंद्रकांत मळवाडे, स्वाती भरत जवळे, वर्षा श्रीकांत घेवारे व भक्ती महेश आवटी असून त्यांना अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. वादी या विधवा असुन त्या माहेरी राहतात. वादीला मराठी भाषा बोलता वाचता येत नाही. प्रतिवादी क्र.२ मयत झाल्याचे वादीला वेळेत समजले नाही. सदरचा झालेला विलंब वादीने जाणुनबुजून केलेला नाही. सबब, त्यांनी अर्ज मंजूर करावेत अशी विनंती केली.

२. मयत प्रतिवादी क्र.२ च्या भावी वारसांना नोटीस काढण्यात आली. त्यानंतर प्रतिवादी क्र.१ व २/१ यांनी नि.क्र.७२ कडे म्हणणे देवून अर्जास विरोध केला. इतर वारसांनी त्यांना नोटीस लागुनही प्रस्तुत कामी हजर होवून म्हणणे दिलेले नाही. प्रतिवादी क्र. १ व २/१ यांच्या म्हणण्याप्रमाणे अर्ज हा मोघम स्वरुपाचा आहे. विलंबाबाबत कोणतेही कारण नमुद नाही. वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये नातेसंबंध असल्यामुळे वादींना प्रतिवादी क्र.२ यांच्या मृत्यू बाबत माहिती नाही ही सबब पटण्याजोगी नाही. विलंबाबाबतची कारणे चुकीची व बेकायदेशीर आहेत. सबब, प्रतिवादीने अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी क्र.२ हे दि.१४/११/२०१६ रोजी मयत झाले आहेत. त्याबाबत फेरिस्त नि.क्र.६७ सोबत त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र जोडले आहे. याशिवाय दावा वाटपासाठी, हक्कज्ञापनासाठी व निरंतर मनाईकरिता आहे. दाव्यातील वास्तविकता व दाव्याचे स्वरुप पाहता मयत प्रतिवादी क्र.२ चे वारस यांना दावा पुढे चालविण्यासाठी हक्क (right to sue survive) राहतो हे स्पष्ट आहे. वादीतर्फे झालेल्या विलंबास कोणतेही ठोस कारण देण्यात आलेले नाही. तरीही उभयतांमधील वाद अंतिमतः गुणदोषावर निकाली काढण्यासाठी अर्जास झालेला

विलंब माफ करुन अबेटमेन्ट रद्द करणे न्याय्य व योग्य आहे. तथापि अर्ज हा खर्चासह मंजूर करणे उचित वाटते. सबब न्यायीक दृष्टीकोनातून खालील आदेश करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज नि.क्र.६१,६३ व ६५ विनंतीप्रमाणे मंजूर करण्यात येतो.

२. मयत प्रतिवादी क्र.२ यांचे वारस अभिलेखावर आणण्यासाठी झालेला विलंब रक्कम रु.५००/– खर्च प्रतिवादींना देण्याच्या अटीवर माफ होवून अबेटमेन्ट रद्द करण्यात येते.

३. वादीने दाव्यात आवश्यक ती दुरुस्ती १४ दिवसाच्या आत करावी.

मिरज.　　　　　　　　　　( स्वाती भा. नाईकनवरे–गरड )

दि. ३०/०३/२०२१　　　　　　दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मिरज

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer. | : | K. A. Udagave (L.G.) |
| Court. | : | Civil Judge,Jr.Dn.,Miraj |
| Date. | : | 30.03.2021. |
| Judgment/order signed by the Presiding Officer on. | : | 30.03.2021. |
| Judgment uploaded on. | : | 01.04.2021. |